# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** हसनाबाद

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0102 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**25/04/2024 23:22

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 25/04/2024

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 25/04/2024

**Time From (वेळेपासून):** 14:26 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:26 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/04/2024 **Time (वेळ):** 23:03 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 014

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/04/2024 23:03 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 25 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** राजुर , राजुर ,भोकरदन

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** कष्णा कारभारी तळेकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2003

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | चांदई एक्को ,भोकरदन ,हसनाबाद,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | चांदई एक्को ,भोकरदन ,हसनाबाद,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7822840044

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कल्पना पंजाबराव काळमेघ | | | 1. घर नंबर 23, शिवाजी नगर, देऊळगाव राजा,देउळगांव राजा, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 12,000/ रुपये लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली | 12,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

12,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 25.04.2024.

मी कृष्णा कारभारी तळेकर वय 21 वर्ष व्यवसाय शेती रा.चांदई एक्को ता.भोकरदन जि.जालना मो.नं. 7822840044.

समक्ष अँन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी दिनांक 25.04.2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर राहुन लेखी तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणी आई वडिलांसह एकत्र राहत असुन सध्या शेती करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.माझे वडील नामे कारभारी बाबुराव तळेकर यांच्या नावावर मौजे चांदई एक्को शिवारात गट नंबर 215 मध्ये 1 हेक्टर 50 आर जमीन आहे. सदर जमीनी मधील 60 आर जमीन माझी आईच्या व 80 आर जमीन माझ्या नावाने करण्याचे आमचे कुटुंबाचे आपसामध्ये ठरले.
त्यानुसार मी दिनांक 23.04.2024 रोजी वाटणीपत्रा नुसार जमीन माझी आई व माझ्या नावाने करण्यासाठी आमचे सजाचे तलाठी श्रीमती कल्पना काळमेघ मॅडम यांची राजुर येथील त्यांच्या खाजगी कार्यालयात भेट घेतली. त्यावेळी त्यांना मी नमुना अर्ज, 100/-रुपयाचे शपथपत्र, वाटणीपत्र, आमच्या तिघांचे आधारकार्ड झेरॉक्स इत्यादी कागदपत्र दिले. तेंव्हा तलाठी श्रीमती कल्पना काळमेघ यांनी मला आमचे वाटणीपत्र करण्यासाठी 20,000/-रुपयाची मागणी करुन माझ्या जवळ असलेले 3,500/-रुपये लगेच अँडव्हास म्हणुन घेतले व उर्वरीत 16,500/-रुपये नंतर दे असे सांगितले.
त्यानंतर मी गावात जावुन विचारपुस केली असता वाटणीपत्र करण्यासाठी कोणतीही शासकिय फी लागत नसल्याचे समजले. मला तलाठी काळमेघ मॅडम यांनी मागणी केलेले पैसे हे लाच असल्याची माझी खात्री झाल्याने मी आज रोजी अँन्टी करप्शन ब्युरो जालना येथे तक्रार देण्यासाठी आलो आहे.
मला तलाठी काळमेघ मॅडम यांना लाच देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांचा माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी जर त्यांना लाच दिली नाही तर त्या माझे वाटणीपत्राचे काम करणार नाही.
मी आज दिनांक 25.04.2024 रोजी आमचे सजाचे तलाठी काळमेघ मॅडम यांची राजुर येथील त्यांच्या खाजगी कार्यालयात जावुन भेट घेऊन माझे कामाबाबत बोलणी करणार आहे. त्यावेळी त्यांनी मला लाचेची मागणी करुन स्वत: किंवा इतरां मार्फत स्विकारल्यास कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशा मजकुराची तक्रार दिली होती.
माझ्या दिलेल्या तक्रारी वरुन अँन्टी करप्शन ब्युरो जालना येथील पोलीस उप अधीक्षक श्री.किरण बिडवे साहेब यांनी दोन शासकिय पंचाना बोलावुन माझी व पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना दाखविली. त्यावर मी, पंचानी व पोलीस उप अधीक्षक श्री.बिडवे यांनी सह्या केल्या.

मी तलाठी काळमेघ मॅडम यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय ? त्या माझ्या कडे लाच मागतात काय ? याची खात्री करण्यासाठी पोलीस उप अधीक्षक श्री.बिडवे साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी वाहनाने व मी माझ्या मोटार सायकलने रवाना होऊन राजुर येथील मोरेश्वर विद्यालयाच्या बाजुला सुरक्षित ठिकाणी थांबलो. त्याठिकाणी पोलीस उप अधीक्षक श्री.बिडवे साहेब यांनी मला, पंचाना व सापळा पथकास सुचना देवुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये पोलीस उप अधीक्षक श्री.बिडवे साहेब, दोन्ही पंचाचे व माझे वक्तव्य घेऊन व्हाईस रेकॉर्डर मशीन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवण्यात आली. त्यानंतर मला पंच क्र.1 झिने यांचे सोबत तलाठी काळमेघ मॅडम यांना भेटण्यासाठी पाठविण्यात आले. मी व पंच क्र.1 झिने असे आम्ही तलाठी काळमेघ यांना भेटण्यासाठी राजुर येथे त्यांच्या नेहमी बसण्याच्या ठिकाणी खाजगी कार्यालयात माझ्या मोटार सायकलने जावुन तलाठी काळमेघ मॅडम यांची भेट घेतली. त्यावेळी माझे व तलाठी काळमेघ मॅडम यांचे आपसात कामा संबंधी चर्चा झाली. त्यावेळी तलाठी काळमेघ मॅडम यांनी पंच क्र.1 झिने यांचे समक्ष वीस हजार असे म्हणाल्या असता मी पहिले साडेतीन हजार दिले

अजूक किती दयावं पडणं, तुम्ही सांगा नेमकं असे म्हणालो असता ठिक हे चालतं नसेल तुमच्याकडे तर बारा करुन घ्या तस नाही असे म्हणाल्या असता मी बारा हजार रुपये आणून देतो मॅडम अं, येतो थोडया वेळानं असे म्हणुन मी व पंच क्र.1 झिने असे आम्ही तेथुन निघुन राजुर येथील मोरेश्वर विद्यालयाच्या बाजुला सुरक्षित ठिकाणी परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर मशीन पोलीस उपअधीक्षक श्री.बिडवे साहेब यांचे सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केली. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पोलीस उपअधीक्षक श्री.बिडवे साहेब यांनी ऐकले. त्यामध्ये तलाठी काळमेघ मॅडम यांनी 20,000/-रुपये लाच मागणी करुन त्यातील 3,500/- रुपये यापुर्वी स्विकारल्याचे मान्य करुन उर्वरीत रक्कमेत तडजोड अंती 12,000/-रुपये मागणी करुन स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले. त्याबाबतचा सापळा पथकाने सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा केला.

त्यावरुन दिनांक 25.04.2024 रोजी तलाठी काळमेघ मॅडम यांचे विरुध्द राजुर येथे त्यांच्या नेहमी बसण्याच्या ठिकाणी खाजगी कार्यालयात सापळा लावण्याचे ठरविले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.बिडवे साहेब यांचे सूचने वरुन खाजगी वाहनात पोलीस अंमलदार श्री.बुजाडे यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट बॅटरीची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तलाठी काळमेघ मॅडम यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या कडील पाचशे रुपये दराच्या 24 नोटा एकुण 12,000/- रुपये रक्कमेला अँन्थ्रासीन पावडर लावली. सदरील अँन्थ्रासीन पावडर लावलेले नोटा माझ्या पॅन्टचे उजव्या खिशात ठेवल्या. पोलीस उप अधीक्षक श्री.बिडवे साहेब यांनी मला व पंचाना सविस्तर सुचना देवुन तलाठी काळमेघ मॅडम यांनी लाच स्विकारल्या नंतर त्यांच्या कार्यालयाच्या बाहेर येऊन उजव्या हाताची बाही वर करुन इशारा करणे बाबत मला सुचना दिली. तसेच सापळा टिम मधील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन सुचना देण्यात आल्या. पोलीस अंमलदार श्री.बुजाडे यांना सापळा पथकातुन वगळुन पंच क्र.2 श्रीमती तोगे यांच्या सोबत राहण्याची सुचना दिली. त्याबाबतचा सापळा पथकाने सविस्तर सापळापुर्व पंचनामा केला.

त्यानंतर पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवुन दिली. मला व पंच क्र.1 झिने यांना तलाठी काळमेघ मॅडम यांना भेटण्यासाठी राजुर येथे त्यांच्या नेहमी बसण्याच्या ठिकाणी खाजगी कार्यालयात पाठविले. मी व पंच क्र.1 झिने असे आम्ही माझ्या मोटार सायकलने राजुर येथे त्यांच्या नेहमी बसण्याच्या ठिकाणी खाजगी कार्यालया जवळ गेलो. माझ्या पाठीमागे पोलीस उपअधीक्षक श्री.बिडवे साहेब हे त्यांचे सापळा पथक व पंच क्र.2 तोंगे यांचे सह खाजगी वाहनाने राजुर येथे तलाठी काळमेघ यांच्या खाजगी कार्यालया जवळ आले व एकमेकांना दिसतील अशा रितीने परिसरात सापळा लावून थांबले.

मी व पंच क्र.1 झिने असे आम्ही तलाठी काळमेघ मॅडम यांच्या खाजगी कार्यालयात जवळ गेलो असता आम्हास त्यांचे खाजगी कार्यालय बंद असल्याचे दिसले. त्यावेळी मी तेथे हजर असलेले आमचे गावचे पोलीस पाटील यांना मॅडम बाबत विचारले असता त्यांनी मॅडम हया बाजुलच्या कार्यालयात गेलेल्या असल्याचे सांगितले. त्यावर मी व पंच क्र.1 झिने असे आम्ही बाजुलच्या कार्यालयात जावुन तलाठी काळमेघ मॅडम यांची भेट घेतली. त्याठिकाणी आमचे कामासंबधी चर्चा झाली. त्यानंतर आमचे बोलणे चालु असतांना पंच क्र.1 झिने यांचे समक्ष मी तलाठी काळमेघ यांना बारा हजार रुपये हे असे म्हणुन मी माझ्या उजव्या हाताने पॅन्टच्या उजव्या खिश्यातुन अँन्थ्रासिन पावडर लावलेले 12,000/- रुपये काढुन तलाठी काळमेघ मॅडम हयांचे समोर धरले असता त्यांनी हम्म असे म्हणुन त्यांचे डाव्या हाताने लाचेची रक्कम घेवून त्यांच्या दोन्ही हातात ठेवली. त्यानंतर मी ठरल्या प्रमाणे लाचेची रक्कम स्विकारल्याचा पूर्व नियोजित इशारा केला. ती वेळ अंदाजे दुपारी अडीच वाजेची होती. त्यानंतर सापळा पथक सक्रीय होवून पंच क्रं. 2 यांचे सह त्या ठिकाणी आले. पोलीस उपअधीक्षक श्री.बिडवे साहेब यांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री. घायवट यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर मशीन ताब्यात घेऊन बंद केली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री. बिडवे साहेब यांनी पंच क्र.1 झिने यांना लाचेची रक्कम कोणी मागितली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.1 झिने यांनी तेथे हजर असलेल्या एका महिलेकडे अंगुली निर्देश करुन हया तलाठी काळमेघ मॅडम असुन हयांनी तक्रारदार यांच्या कडुन डाव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारुन त्यांच्या दोन्ही हातात ठेवली आहे असे सांगितल्याने तलाठी काळमेघ मॅडम यांना पंचा समक्ष लाचेच्या रक्कमेसह जागेवर पकडले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री.बिडवे साहेब यांनी त्यांची, पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर तलाठी काळमेघ मॅडम हयांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव कल्पना पंजाबराव काळमेघ वय 35 वर्षे व्यवसाय नोकरी तलाठी सजा चांदई एक्को तहसील कार्यालय भोकरदन रा.घर नंबर 23, शिवाजी नगर, देऊळगाव राजा जि.बुलडाणा असे सांगीतले. त्यांनी स्वीकारलेली रक्कम कोठे ठेवली असे विचारले असता त्यांनी त्यांचे दोन्ही हातात ठेवल्याचे सांगितल्याने पंच क्र.2 श्रीमती तोगे यांनी त्यांच्या दोन्ही हातामधुन 12,000/- रुपये काढुन घेवुन सदर नोटांचे क्रमांक व सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली. त्यानंतर

सदर रुम मधील लाईट खिडक्या बंद करुन काळ्या कपडयाच्या सहायाने अंधार करुन पोलीस उपअधीक्षक श्री. बिडवे साहेब यांनी अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या सहायाने तलाठी काळमेघ मॅडम याचे दोन्ही हात व लाचेच्या नोटा चेक केल्या असता तलाठी काळमेघ मॅडम यांचे दोन्ही हाताचे बोटावर तसेच लाचेच्या नोटावर ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली.त्यानंतर सदर 12,000/- रुपये लाचेची रक्कम पंचा समक्ष जागीच लाख सिल मोहर करुन जप्त करण्यात आली. तसेच माझे हात व अंगावरील कपडे अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या सहायाने चेक केले असता माझे उजव्या हाताचे बोटावर व अंगातील पॅन्टच्या उजव्या बाजुच्या समोरील खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री.बिडवे, सापळा पथक, दोन्ही पंच, मी व तलाठी काळमेघ मॅडम असे अँन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात आलो. तसा सविस्तर सापळा पथकाने सापळा पंचनामा केला. तरी तलाठी काळमेघ मॅडम यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विनंती. मी दिलेली फिर्याद माझे सांगणे प्रमाणे पोलीस अंमलदार श्री.चेके यांनी संगणकावर मराठीत टंकलीखीत केली असुन त्याची प्रिंट काढुन मी वाचुन पाहिली. ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

**or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**
Sanjay Baburao Ahire
**Rank (**पद**):** I (Inspector) **No.(**क्र.**):** API
**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**
**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** Sanjay Baburao Ahir

**Rank(**पद**):** I (Inspector)

**No.(**सं.**):** API

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** (भाजल्याच्या खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)